महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: www.mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा वार्तापत्र

माहे- आक्टोंबर-२०२५

शुभेच्छा संदेश

## संपादकीय संदेश



श्री.सुहास वारके
अपर पोलीस महासंचालक व कारागृह
महानिरीक्षक व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रिय सर्व अधिकारी व कर्मचारी,

सर्वप्रथम, दीपावलीच्या या पवित्र आणि आनंदाच्या पर्वानिमित्त आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा! दीपावली केवळ एक सण नाही, तर तो आपल्याला जीवनातील सकारात्मकतेकडे आणि समृद्धीकडे मार्गदर्शन करणारा एक प्रकाशपर्व आहे.

आपल्या कामाच्या क्षेत्रातील प्रत्येक प्रयत्न, कठोर परिश्रम आणि एकोपा यामुळे आपल्या विभागात एक चांगली कार्यसंस्कृती निर्माण झाली आहे. या दिवाळीच्या सणाच्या माध्यमातून, आपण ज्या ध्येयासाठी एकत्र काम करत आहात, त्याच्या आणखी जवळ पोहोचण्याचा विश्वास मनात बाळगूया.

दीपावलीच्या या पवित्र दिवशी, आपल्या कुटुंबांसह आनंद, आरोग्य आणि समृद्धी मिळो. आपल्या जीवनातील अंधकार दूर होवो आणि प्रत्येक पावलावर यशाचा ठसा उमठावा. हा सण आपल्या सर्वांच्या जीवनात नव्या आशा आणि उत्साहाचा संचार करेल, असे मला खात्री आहे.

महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## शुभेच्छा संदेश

आपण सर्वांनी मिळून जेव्हा एकमेकांना आधार दिला, त्याचप्रमाणे भविष्याच्या वाटचालीतही एकमेकांना मदत करून उत्कृष्ट कार्य करणे हेच आपले मुख्य ध्येय असू द्यावे. आपल्या योगदानामुळेच आम्ही अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतो आणि एका सामूहिक प्रयत्नात उत्तम कार्यक्षमता सिद्ध करू शकतो.

दीपाच्या प्रकाशासारखा आपल्या जीवनात समृद्धी, सुख आणि आनंदाची चांगली लाट येवो. ही दीपावली आपणा सर्वांसाठी एक नवीन प्रारंभ ठरो आणि आपल्या विभागासमोर असलेल्या सर्व आव्हानांना स्वीकारत **"सुधारणा व पुनर्वसन"** या कारागृह विभागाच्या ब्रीद वाक्यानुसार बंद्यांच्या कल्याणाकरीता एकत्रित काम करुया..

जय हिंद....

महाराष्ट्र कारागृह विभागात उल्लेखनिय कर्तव्य बजावलेल्या एकुण आठ अधिकारी / कर्मचारी यांना सन्मा. राष्ट्रपती महोदयांचे Presidents Medal For Meritorious Service २०२५ घोषीत झाले आहे

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे मा. डॉ. सुहास वारके (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हस्ते व मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,मा. श्री. सुनिल एन ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह तसेच कारागृह अधिकारी / कर्मचारी यांचे उपस्थितीत पार पाडला.

मा. महोदयांचे हस्ते सन २०२४ मध्ये येरवडा मध्यवर्ती कारागृहातील श्री सतिश गुंगे, सुभेदार, श्री नवनाथ भोसले, हवालदार, श्री नामदेव भोसले, हवालदार यांना सन्मानीय राष्ट्रपतीचे गुणवत्तापुर्ण सेवेबाबतचे राष्ट्रपती पदक जाहीर झाले ते पदक, प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ प्रदान करुन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र कारागृह विभागात १५ ऑगस्ट २०२५ करीता उल्लेखनिय कर्तव्य बजावलेल्या एकुण आठ अधिकारी / कर्मचारी यांना सन्मा. राष्ट्रपती महोदयांचे **Presidents Medal For Meritorious Service २०२५** घोषीत झाले आहे. त्यामध्ये श्रीमती. राणी राजाराम भोसले, अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह, श्री. राजाराम रावसाहेब भोसले, अति. अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह, श्री. गजानन काशिनाथ सरोदे, उपअधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह, श्री. संजय गंगाराम शिवगण, सुभेदार, मुंबई मध्यवर्ती कारागृह, श्री.सुधाकर ओकार चव्हाण, हवालदार मुंबई मध्यवर्ती कारागृह, श्री. राजेश मधुकर सावंत, हवालदार, भायखळा जिल्हा कारागृह, श्री. संजय सदाशिव जाधव, हवालदार, भायखळा जिल्हा कारागृह, श्रीमती. विद्या भारत ढेंबरे, कारागृह शिपाई कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह, कळंबा यांचा समावेश आहे.मा. महोदयांचे हस्ते सन्मा. राष्ट्रपतींचे उल्लेखनिय सेवेसाठी पदक जाहीर झाल्याबाबत संबंधीत कारागृह अधिकारी / कर्मचारी यांना पुष्पगुच्छ व प्रशंसापत्रदेवून गौरविण्यात आले.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

**दिवाळी पहाट**

संपुर्ण भारत वर्षामध्ये दिवाळी हा सण मोठया उत्साहात साजरा करण्यात येतो, कारागृहातील बंदी सुध्दा यापासून वंचित राहू नये याकरीता कारागृहात सांस्कृतीक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करुण बंदयांना त्यामध्ये सहभागी करण्यात येते. "सुधारणा व पुनर्वसन" हे कारागृह विभागाचे ब्रिद वाक्य असून कारागृहामध्ये बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात.

त्याअनुषंगाने, दिनांक 21.10.2025 रोजी दिवाळी सणानिमित्य नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयांच्या मनोरंजनासाठी "हार्मोनी इव्हेंन्टस म्युजिकल ग्रुप, नागपूर" या संस्थेमार्फत बंदयांसाठी दिवाळी पहाट कार्यक्रमाव्दारे सुमधूर गित संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमावेळी श्री. वैभव आगे, अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह तथा कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपूर यांनी उपस्थित बंदयांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व ज्याप्रमाणे तिमिरातून तेजाकडे जाण्याचा पर्व म्हणून दिवाळी सण साजरा केला जातो, त्याप्रमाणे आपण सुध्दा आपले जिवनातील अंध:कार, अहंकार दुर करुन आपसातील व्देषभावना दुर करुन आपल्या भविष्याची नव्याने वाटचाल करावी, असे मोलाचे मार्गदर्शन केले.







महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

दिवाळी पहाट

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

दि. १९.१०.२०२५ रोजी Rose Gold Production. Pvt.Ltd, Ambegaon, Katraj, Pune या संस्थेमार्फत दिपावली सणाचे औचित्य साधून कारागृहातील बंद्यामध्ये आनंद, उत्साह, सकारात्मकता तसेच बंद्याच्या जीवनातील नकारात्मकता, अंधकार दुर करुन ज्ञानाचा आणि मांगल्याचा प्रकाश आणण्याचे उद्देशाने बंद्यांकरीता दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दिवाळी सण फक्त दिव्याची रोषणाई नाही, तर तो उत्साह, आनंद, एकता, कृतज्ञता आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा महत्वाचा उत्सव आहे. सदर कार्यक्रमामध्ये श्रीमती ऐश्वर्या परदेशी, श्री. अक्षय गजभिये, गायक श्रीमती राजेश्वरी रत्नपारखी, बासरी वादक, श्री विशाल वानखडे, श्रीमती शोभा कुलकर्णी, श्रीमती सायली राजहंस व इतर कलाकारांनी शास्त्रीय संगीत, भक्ती गीत, मराठी, हिंदी गाणी सादर केली. त्यामध्ये ११५० बंद्यांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.





**दि.१७.१०.२०२५ दिपावली सणानिमित्त कारागृह बंदी निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळावा उद्घाटन सोहळा**

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

महाराष्ट्र कारागृह उद्योगअंतर्गत बंद्यांनी तयार केलेल्या विविध वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन दिवाळी मेळावा कारागृह बंदी निर्मित वस्तुंचे विक्री व प्रदर्शन मेळाव्याचे उद्घाटन मा. डॉ. सुहास वारके (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत आज रोजी मराठी अभिनेत्री मा. श्रीमती सुरभी हांडे यांचे शुभहस्ते करण्यात आले.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**दिवाळी सणानिमित्त नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केंद्राचे उदघाटन दिनांक 13.10.2025**

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

दिवाळी सणानिमित्त् नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केंद्राचे उदघाटन दिनांक 13.10.2025 रोजी मा. श्रीमती कांचनताई गडकरी, अध्यक्षा संस्कारभारती संस्था, नागपूर यांचे शुभहस्ते करण्यात आले.

"आपण देखील एक समाजाचा घटक आहोत आणि आपण देखील समाजाचे काही देणे लागतो या भावनेने समाजाविषयी कृतज्ञतेची भावना ठेवण्याच्या दृष्टीने कारागृहातील महिला व पुरुष बंदी बांधवांनी बनविलेल्या अत्यंत सुबक व कलाकुसरीच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री दिवाळी सणाचे माध्यमातून करण्यात येत आहे."

कारागृह उद्योगात बंदयांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या लाकडी, लोखंडी, कापडी व इतर शोभेच्या वस्तू या सामान्य नागरीकांना विक्रीकरीता रक्षाबंधन, दसरा व दिवाळी या सनानिमित्त उपलब्ध् करुन देण्यात येतात. यावर्षी सुध्दा कारागृहात बंदयांनी तयार केलेल्या वस्तू समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध् व्हावा या उददेशाने बंदयांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यांचेकडून आकर्षक वस्तूंचे उत्पादन कारागृहात करण्यात आले. सदरच्या वस्तू विक्री करीता नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे विक्री केंद्र, कारागृह परिसर, नागपूर या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध् करुन देण्यात आल्यात.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

**दिवाळी मेळावा कार्यक्रम**

मा.डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचे प्रमुख उपस्थितीत दिवाळी मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करुन कारागृह निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळी सणाचे कालावधित रु.३,५४,९२७ इतक्या किंमतीच्या वस्तुंची विक्री करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

दिवाळी पहाट

# नाशिक मध्यवर्ती कारागृह

कारागृहांत शिक्षा भोगत असताना सुधारणा व पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत बंद्यांना विविध व्यावसायीक कला कौशल्ये आत्मसात करण्याची संधी प्राप्त करुन दिली जाते. दिवाळी मेळा कार्यक्रमातून नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहांतील बंद्यांनी कारागृहांत निर्मिती केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री केली जाते.

दिवाळी मेळा केंद्राचे उद्घाटन नाशिक जिल्हाधिकारी मा. श्री. आयुष प्रसाद यांचे हस्ते फित कापून व दिप प्रज्वलन करुन करण्यात आले. या प्रसंगी प्रास्ताविकांत कारागृह अधिक्षक मा. श्रीमती अरुणा मुगूटराव यांनी कारागृहांत बंद्यांकरीता उपलब्ध असणा-या विविध उपक्रमांची व वस्तूंचे उत्पादन व विक्री बाबत माहिती देऊन बंदी निर्मित उत्पादने खरेदी करण्याचे उपस्थितांना आवाहन केले. प्रमुख पाहुणे मा. जिल्हाधिकारी श्री आयुष प्रसाद यांनी बंद्यांच्या निर्मिती कौशल्याचे कौतुक करुन बंद्यांना समाजाच्या मुख्य धारेत पुनर्वसित करण्यासाठी चालणा-या अशा उपक्रमांसाठी कारागृह प्रशासनाचे कार्य मोलाचे असल्याचे प्रतिपादीत केले.





महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

## दिवाळी फराळ

दि.२०.१०.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे कारागृह अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमावेळी श्री. सुनिल ढमाळ, अधीक्षक येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांनी मार्गदर्शन करत सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दिपावली सणाच्या शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून कारागृह अधिकारी / कर्मचारी यांच्यात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन, त्याचे मनोबल वाढण्यास मदत होईल.



## इतिहास विषयक अभ्यासक व समाजसेवक श्री. विक्रमसिंग मोहिते यांचे व्याख्यान

दि.२७.०९.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांसाठी इतिहास विषयक अभ्यासक व समाजसेवक श्री. विक्रमसिंग मोहिते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते. त्यांनी बंद्यांना इतिहासाविषयी माहिती व मार्गदर्शन केले. यामध्ये २०० बंद्यांनी सहभाग नोंदवला. सदर उपक्रमाचा लाभ निश्चितच बंद्यांसाठी होईल.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई लोकलेखा समितीची स्थळ पाहणी व बैठक दि.११.०९.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे पार पडली.**

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

दि.११.०९.२०२५ रोजी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१७-१८ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.२.२ महाराष्ट्रातील कारागृह आणि सुधार केंद्राचे प्रशासन या संदर्भात क्षेत्रिय कारागृह अधिकारी यांचेसोबत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई लोकलेखा समितीची स्थळ पाहणी व बैठक दि.११.०९.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे पार पडली.

सदर बैठकीकरीता मा. श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स तथा समिती प्रमुख, मा. श्री. समीर कुणावार, वि.स.स, मा. श्री. सुहास बाबर, वि.स.स, मा. श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स, मा. श्री. अनिल पाटील, वि.स.स, मा. श्री. रोहित पवार, वि.स.स, मा. श्री. कृपाल तुमाने, वि.प.स, मा. श्री. संजय खोडके, वि.प.स, मा. ॲड. श्री. अनिल परब, वि.प.स, मा. श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स, मा. डॉ. सुहास वारके (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, श्री. सुनिल एन ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे उपस्थित होते.

सदर भेटीमध्ये मा. समिती सदस्य यांनी कारागृहातील गांधी यार्ड, व्ही सी कोर्ट, ई-मुलाखत, टिळक यार्ड, मुख्य स्वयंपाकगृह, सर्कल क्र.०१, बंदी बरॅक, कारखाना विभाग, बंदी मुलाखत कक्ष, अतिसुरक्षा विभाग, महिला विभाग येथे प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी मा. समिती सदस्यांनी प्रत्यक्ष बंद्यांशी संवाद साधुन कारागृहीन सोई-सुविधा, बंदी अडी-अडचणी, कारागृह अडी-अडचणी याबाबत पाहणी करुन माहिती जाणुन घेतली.




महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

**कौशल्य प्रशिक्षण** (Skill Training) **प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम दिनांक : २१ सप्टेंबर २०२५**

दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे कौशल्य प्रशिक्षण (Skill Training) प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. अतुलचंद्र कुलकणी साहेब, माननीय सदस्य, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), मुंबई हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात अतिथींच्या स्वागताने झाली. या वेळी ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक श्रीमती.राणी रा.भोसले मॅडम यांनी प्रास्ताविक करून कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रमांविषयी माहिती दिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विविध कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बंद्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये बेकरी उत्पादन, डेकोरेटिव्ह वॉल पेंटिंग, संगणक प्रशिक्षण, दुचाकी दुरुस्ती, एम्ब्रॉयडरी, सौंदर्य प्रसाधन प्रशिक्षण इत्यादी उपक्रमांचा समावेश होता.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बंद्यांनी आत्मविश्वासाने समाजात पुनर्वसन करून स्वतःचे जीवन उन्नत करण्याचे आवाहन केले. तसेच, कारागृह प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करून, या प्रशिक्षणामुळे बंद्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतील असा विश्वास व्यक्त केला.त्यांनी या उपक्रमामुळे पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक परिणामकारक होईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. लक्ष्मण साळवे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. विलास कापडे, उपअधीक्षक यांनी मान्यवरांचे, उपस्थित सर्व अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी तसेच अधिकारी-कर्मचारी व उपस्थितांचे मान्यवर बंदी विद्यार्थ्यांचे आभार मानून केले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाला.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## सांगली जिल्हा कारागृह

**बंदयांना संगणक प्रशिक्षण**

सांगली जिल्हा कारागृह येथे कौशल्य विकास यामधून बंदयांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले आहे.





**नेत्रतपासणी व दंत चिकित्सक शिबीर**

सांगली जिल्हा कारागृह येथे समता फौडेंशन यांचे मार्फत बंदयांन करिता नेत्रतपासणी शिबीर आयोजित केले. व भारती विद्यापीठ यांच्या मार्फत बंदयांन करिता मोफत दंत चिकित्सक शिबीर आयोजित करण्यात आले.





# महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## बुलढाणा जिल्हा कारागृह

### गांधी जयंती निमीत्य गांधी विचार प्रचार परिक्षाचे आयोजन

मुंबई सर्वोदय मंडल, व बुलढाणा जिल्हा कारागृह यांचे संयुक्त विद्यमाने दि.02.10.2025 (गांधी जयंती निमीत्य) रोजी गांधी विचार प्रचार परिक्षा चे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेमध्ये या कारागृहातील 40 पुरुष बंदी व 11 महिला बंदी यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच सहभागी सर्व बंद्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले होते.





### समता फाउंडेशन यांचेमार्फत त्वचारोग शिबीर

समता फाउंडेशन यांचेमार्फत त्वचारोग शिबीर आयोजित करण्यात आलेले होते. सदर शिबीरामध्ये 65 बंदींची तपासणी करण्यात आलेली आहे.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# नांदेड जिल्हा कारागृह

किर्तनकार श्री.ह.भ.प.श्री निलेश भैया झरेगावकर यांनी नांदेड जिल्हा कारागृहात किर्तनाव्दारे माणसाच्या स्वभावाचे विविध रंग व रंगाच्या विविध छटा यांचे सुंदर आणि श्रवणीय असे विश्लेषण प्रबोधनातुन बंदी बांधवांना दिले, किर्तन हे समाज प्रबोधनाचे किती मोठे साधन आहे आणि यातुन मणसाचे मनपरिवर्तन करणे शक्य आहे, हे बंदी बांधवांना किर्तनाव्दारे महाराज यांनी उदबोधन केले. श्री.ह.भ.प.श्री निलेश भैया झरेगावकर महाराज यांनी केलेल्या किर्तनामुळे बंद्यांच्या मनावर निश्चित अनुकुल परिणाम होण्यास मदत होणार आहे.

**श्री.ह.भ.प.श्री. निलेश भैया झरेगावकर महाराज यांचे किर्तन**



गळाभेट कार्यक्रम

# नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

मा. कारागृह उपमहानिरीक्षक, नाशिक विभाग, नाशिक तथा अधिक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह श्रीमती अरुणा मुगूटराव यांच्या उपस्थितीत झालेल्या या भावस्पर्शी कार्यक्रमा प्रसंगी सर्वांचीच मने हेलावून गेली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारागृहाचे वरिष्ठ तुरुंगाधिकारी ( प्रशासन) श्री, सुधाकर कांबळे यानी केले. श्रीमती अरुणा मुगूटराव यांच्या हस्ते बंद्यांच्या पाल्यांना पुष्प, चॉकलेट व फुगे देऊन बंदी पाल्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सदर कार्यक्रमाचे कौतूक करून कारागृहाच्या सुधारणा व पुनर्वसन या उद्दीष्टाप्रती असे कार्यक्रम मुलगामी सहाय्यीभूत ठरतात असे प्रतिपादन केले, तसेच या उपक्रमातील "प्रयास" सामाजिक विज्ञान संस्थेच्या सहभागाचेही त्यांनी कौतूक केले. कार्यक्रमा प्रसंगी सहभागी बंदीजन व त्यांच्या पाल्यांना कारागृह प्रशासनाकडून अल्पोपहार देण्यात आला तसेच बंद्यांचे पाल्याना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. कारागृहातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे या कार्यक्रमास सहाय्य लाभले.






महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# चंद्रपूर जिल्हा कारागृह

**गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री**

गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंती निमित्त मातोश्री विद्यालय, चंद्रपूर यांचेमार्फत महात्मा गांधी यांचे जिवनचरित्रावर आधारित नाट्य प्रदर्शित करण्यात आले.





**डेटा एन्ट्री प्रशिक्षण**

श्री.श्री. रुरल फाउंडेशन, ट्रस्ट, बंगळुरू यांचेमार्फत 60 पुरूष बंद्यांकरीता 2 महिने 15 दिवस कालावधीचे डेटा एन्ट्री प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन सन्मा. श्रीमती,समृध्दी भिष्म, प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचेहस्ते उद्घाटन करण्यात आलेले असून, सदर प्रशिक्षणाचा लाभ घेवून कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर त्यांचेपुढील आयुष्यामध्ये प्रशिक्षणाचा उपयोग करणेबाबत बंद्यांना मार्गदर्शित केले.





महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

**जागतिक बुध्दिबळ स्पर्धेत येरवडा मध्यवर्ती कारागृहास सुवर्ण पदक**

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे यांचेमार्फत आयोजित परिवर्तन-प्रिझन टू प्राइड या उपक्रमाअंतर्गत दि.१४.१०.२०२५ ते १६.१०.२०२५ या कालावधीत FIDE या जागतिक बुध्दीबळ संघटने तर्फे पाचवी जागतिक आंतर कारागृह ऑनलाईन बुध्दिबळ स्पर्धा पार पडली. सदर स्पर्धेत ५७ देशातील एकुण १३५ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम फेरीत भारताचे प्रतिनिधत्व करणा-या येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंद्यानी अत्यंत चुरशीने झालेल्या सामन्यात एल-साल्वादोर या देशाच्या संघाचा टायब्रेकर मध्ये पराभव करत दुसऱ्यांदा सुवर्ण पदक मिळविले. तत्पुर्वी आशियाई गटात व्दितीय व युरोप - आशिया गटात प्रथम क्रमांक मिळवित अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. परिवर्तन तिमिरातून तेजाकडे या इंडियन ऑइल कॉपोरेशन ने भारतातील विविध कारागृहांमध्ये राबविलेल्या उपक्रमांतर्गत मागील पाच वर्षापासून येरवडा कारागृहातील बंदीजन हे बुध्दिबळाचे प्रशिक्षण घेत आहेत.

यापुर्वीचे उल्लेखनिय योगदान खालील प्रमाणे

सलग चार वेळा राष्ट्रीय विजेतेपद
सन - २०२२ मध्ये जागतिक स्पर्धेत कास्य पदक विजेता
सन - २०२३ मध्ये जागतिक स्पर्धेत सुवर्ण पदक विजेता
सन - २०२४ मध्ये जागतिक स्पर्धेत चौथा क्रमांक
सन -२०२५ मध्ये पहिल्या आशियाई स्पर्धेत रौप्य पदक विजेता



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

**नेत्ररोग व त्वचारोग तपासणी शिबिर**

दि.०३.१०.२०२५ रोजी समता फाऊंडेशन, मुंबई या अशासकीय संस्थेमार्फत सामाजिक बांधिलकी जपत येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांसाठी त्वचारोग, नेत्ररोग या सारखी वैद्यकीय शिबिरे तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करुन प्रशंसनिय उपक्रम राबविण्यात येतात. त्यानुसार रोजी तज्ञ त्वचारोग व नत्ररोग चिकित्स्क यांचे मार्गदर्शनाखाली औषधपुरवठयासह नेत्ररोग व त्वचारोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिरामध्ये १०६ बंद्यांची नेत्ररोग व ४०८ बंद्यांची त्वचारोग तपासणी करण्यात आली.







महाराष्ट्र शासन

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,

कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# ठाणे मध्यवर्ती कारागह

"अभिजात मराठी भाषा सप्ताह"

'मराठी ग्रंथ संग्रहालय,ठाणे' यांचे सौजन्याने

कारागृहातील बंद्यासाठी ग्रंथ प्रदर्शनी व कारागृहास ग्रंथ भेट.

ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथेही अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाची संपूर्ण रूपरेषा व नियोजन कारागृहाच्या अधीक्षक श्रीमती राणी रा. भोसले यांनी तयार केले. कार्यक्रमाचे उद्दिष्ट कारागृहातील बंदींमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करणे, वाचन संस्कृतीचा प्रसार करणे तसेच साहित्य आणि भाषिक अभिरुची वाढविणे हे आहे.

या निमित्ताने आज, बुधवार दि. ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत 'मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे' यांच्या सौजन्याने ठाणे मध्यवर्ती कारागृहात ग्रंथ प्रदर्शनी भरविण्यात आली. या प्रदर्शनीत मराठी भाषेतील विविध नामांकित लेखकांचे ग्रंथ, चरित्रे, कादंबऱ्या, कवितासंग्रह, आत्मचरित्रे, सामाजिक आणि प्रेरणादायी साहित्य अशा विविध विषयांवरील ग्रंथांचे प्रदर्शन करण्यात आले.

ग्रंथ प्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी 'मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे' च्या ग्रंथपाल, श्रीमती वंदना माने यांनी अति. अधीक्षक श्री. राजाराम भोसले यांना प्रदर्शनीसाठी ठेवण्यात आलेल्या सर्व ग्रंथांचे विनामूल्य भेट स्वरूपात हस्तांतर करण्यात आल्याचे पत्र सुपूर्द केले. 'मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे' या संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्यवाह श्री. दुर्गेश आकेरकर, कार्यकारिणी सदस्य श्री. निशिकांत महांकाळ, लिपिक श्रीमती मनुजा चव्हाण व श्रीमती. मीनल गाडवे, शिपाई श्री.सचिन नाईक हे मान्यवर प्रतिनिधी उपस्थित होते.

या प्रसंगी अति. अधीक्षक श्री. राजाराम भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाचनाचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "वाचन हे व्यक्तिमत्व विकासाचे साधन असून ते मनाची दारे उघडते. पुस्तकांच्या माध्यमातून आपण विचार, संस्कार आणि ज्ञान यांचा साठा वाढवू शकतो. कारागृहात वाचनाची संस्कृती जोपासल्यास बंदीजनांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवता येतो."



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# ठाणे मध्यवर्ती कारागृह

**ठाणे मध्यवर्ती कारागृह**

**आर.ओ. वॉटर कुलर भेट**

**दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५**

दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे बंद्यांच्या मुलाखतीसाठी येणाऱ्या नातेवाईकांच्या प्रतिक्षालयात इनरव्हील क्लब ऑफ ठाणे वेस्ट यांच्या सौजन्याने आर.ओ. वॉटर कुलर भेट देण्यात आला. या प्रसंगी इनरव्हील चेअरमन श्रीमती लक्ष्मी सिंग, माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री. कुमार केवलरमाणी, रोटरी क्लब ऑफ ठाणे वेस्टचे अध्यक्ष श्री. संतोष कदम, तसेच इनरव्हील क्लब ऑफ ठाणे वेस्टच्या अध्यक्षा श्रीमती सुखी कोपरकर हे मान्यवर उपस्थित होते.आर.ओ. वॉटर कुलरमुळे कारागृहात येणाऱ्या बंद्यांच्या नातेवाईकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून, या सामाजिक उपक्रमाबद्दल कारागृह प्रशासनाने इनरव्हील क्लब ऑफ ठाणे वेस्ट यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# सोलापूर जिल्हा कारागृह

**१० ऑक्टोंबर जागतीक मानसिक आरोग्य दिन**

जागतीक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून दिनांक - १४.११.२०२५ रोजी मानसोपचार विभाग, जिल्हा सामान्य रूग्णालय, सोलापूर यांचे मार्फत कारागृहातील बंदयांचे मानसिक आरोग्य चांगले राहावे, म्हणून समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




**रक्तदान शिबीर**

सोलापूर शहर व जिल्हयामध्ये रक्ताची कमतरता निर्माण झाल्याने डॉ. हेडगेवार रक्तपेढी, सोलापूर यांनी रक्तदान करणेबाबत आव्हान केले होते, त्यांच्या विनंतीला मान देवून दिनांक -३१.१०.२०२५ रोजी सोलापूर जिल्हा कारागृह येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबीरात अधिकारी-कर्मचारी यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेवून रक्तदान केले.



महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

## अमरावती मध्यवर्ती कारागृह

**माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जयंती**

दिनांक १५/१०/२०२५ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन निमित्त कारागृहातील बंदयांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



**सरदार पटेल यांचे जयंती**

दिनांक ३१/१०/२०२५ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे सरदार पटेल यांचे जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन निमित्त कारागृहातील अधिकारी कर्मचारी यांना शपथ देण्यात आली.







महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

"शिववैभव किल्ले स्पर्धा" कारागृहातील बंदी बांधवांनी तयार केलेला रायगड किल्ला

खासदार सांस्कृतीक महोत्सव समिती नागपूर यांचेतर्फे शिववैभव किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. सदर स्पर्धेमध्ये नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. वैभव आगे यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहाने सहभाग घेतला.

सदर स्पर्धेसाठी नागपूर मध्यवर्ती कारागृहातील शिक्षा बंद्यांनी आपल्या कला आणि श्रमाच्या बळावर ऐतिहासीक रायगड किल्ल्याची सुंदर प्रतिकृती तयार केली. या प्रतिकृतीची निर्मिती बंद्यांनी कारागृहात उपलब्ध साधनसामुग्री वापरुन केली आहे. कागद, माती व रंग यांच्या साहाय्याने त्याने रायगड किल्ल्याचे सूक्ष्म् तपशीलही जपले. कारागृहातील उपलब्ध साहित्याचा वापर करुन तयार केलेली ही प्रतिकृती केवल एक कलाकृती नसून ती स्वाभीमान, स्वराज्य आणि प्रेरणेचे प्रतीक ठरत आहे. शिवरायांचे गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगडाचे हे प्रतिरुप पाहून सर्वांनी त्यांच्या कल्पकेतेचे आणि परिश्रमाचे कौतूक केले. दिवाळी सणाच्या आनंदात या अनोख्या कलाकृतीने कारागृहाचे वातावरण उजळले असून ही निर्मीती बंद्यांच्या प्रतिभेचे आणि आत्मोन्नतीचे प्रतीक ठरत आहे.

कारागृह अधीक्षक श्री. वैभव आगे यांनी या उपक्रमाचे कौतूक करत म्हटले की, अशा उपक्रमांमुळे कारागृहातील बंद्यांच्या सुप्त कुलागुणांना दिशा मिळते आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळते.






महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

## महिलांना नि:शुल्क मेहंदी लावण्याचा उपक्रम

दिवाळी सणानिमित्त् नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे दिनांक 13.10.2025 रोजी मा. नितीनजी गडकरी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री, भारत सरकार यांच्या संकल्पनेतून खासदार महोत्सव समिती व्दारे "महिलांना नि:शुल्क मेहंदी लावण्याचा उपक्रम" आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे उदघाटन मा. श्रीमती कांचनताई गडकरी, अध्यक्षा संस्कारभारती संस्था, नागपूर यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमामध्ये कारागृह विभागातील महिला अधिकारी/कर्मचारी व महिला बंदींना संस्थेमार्फत मेहंदी लावण्यात आली. श्रीमती कांचनताई गडकरी यांनी कारागृहातील बंदीपण एक समाजाचा घटक आहेत, मानसाच्या रागातून अपराध घडतो व त्यामुळे त्यांना कारागृहात यावे लागते. बंदयांनी आपली कला जिवंत ठेवली पाहिजे, कलेमधून दु:ख विसरता येते, तसेच मन:शांतीसाठी अध्यात्माच्या मार्गाचे अनुसरन करावे असा मोलाचा सल्ला दिला.







महाराष्ट्र शासन
अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: www.mahaprisons.gov.in

मार्गदर्शनपर संदेश

# मार्गदर्शनपर संदेश



योगेश देसाई
विशेष कारागृह महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

आपल्या सर्वांच्या हाती सुपूर्त होत असलेल्या या कारागृह मासिकाच्या नव्या अंकाचे मनःपूर्वक स्वागत करत आहे. कारागृह ही फक्त शिक्षा भोगण्याची जागा नसून, मानवी मूल्यांची पुनर्बांधणी करण्याचे एक संस्कार केंद्र आहे.

या मासिकाच्या माध्यमातून कारागृहातील बंदीबंधूंना आपली सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी मिळावी, समाजाशी सकारात्मक नाते जोडले जावे आणि आत्मपरिवर्तनाची नवी दिशा मिळावी, हा आमचा उद्देश आहे. लेखन, कविता, चित्रकला, कथा, जीवनअनुभव अशा विविध माध्यमातून व्यक्त होणारे विचार यातून उभे राहणारे व्यक्तिमत्त्व अधिक संवेदनशील, सजग आणि समाजाभिमुख होताना आम्ही पाहत आहोत—हे निश्चितच प्रेरणादायी आहे.

कारागृह प्रशासन, अधीक्षक, कर्मचारी आणि सर्व बंदीबंधू यांनी दाखवलेले परस्पर सहकार्य व शिस्तबद्ध काम यामुळेच हे मासिक नियमितपणे प्रकाशित होणार आहे. सुधारणा आणि पुनर्वसन हे आमचे प्रमुख ध्येय असून, त्यादृष्टीने ज्ञान, कला, शिक्षण आणि सकारात्मक विचारांचे पोषण करण्यासाठी अशा उपक्रमांचे अमूल्य योगदान आहे.

आगामी काळात हे मासिक अधिक गुणवत्तापूर्ण, अधिक मार्गदर्शक आणि अधिक लोकाभिमुख व्हावे, ही अपेक्षा.

जय हिंद....

मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक , कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे 01 यांचे मान्यतेने

श्रीमती रजनी मोटके
शिक्षिका

श्री. प्रदीप बाबर
तुरुंगाधिकारी श्रेणी -2

श्री. प्रशांत मत्ते
संशोधन अधिकारी

श्री. सुहास पवार
अधीक्षक